चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

१५ मे., २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग करणाऱ्या आरोपीस न्यायालयाने ठोठावली १० वर्ष शिक्षा

पोलीस स्टेशन राजुरा अंतर्गत अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग करणाऱ्या आरोपीस १४/०५/२०१९ रोजी **कु. अन्सारी, जिल्हा सत्र न्यायाधिश क्रं. ०२ यांनी १० वर्ष कारावासाची शिक्षा ठोठावली.**

पोलीस स्टेशन राजुरा अंतर्गत दिनांक १५/०७/२०१६ रोजी राजुरा येथे **आरोपी नामे कवडु मधुकर आत्राम, वय २५ रा. राजुरा,** याने अल्पवयीन फिर्यादीस तिचे घरी एकटी असल्याचे पाहले व पाणी पिण्याचा बहाना करून तिचे घरात घसुन तिचे सोबत अतिप्रसंग केला. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन राजुरा येथे अप.क्र. ३३७/२०१६ कलम ४५०,३७६(१),३७६(२)(आय) भादंवि सहकलम ४ पोस्को अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास **सहा. पोलीस निरीक्षक श्री. केदार** पोस्टे राजुरा यांनी पुर्ण करून आरोपी विरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक १४/०५/२०१९ रोजी **आरोपी नामे कवडु मधुकर आत्राम, वय २५ रा. राजुरा, यास कलम ४५० भादवी मध्ये ०५ वर्ष शिक्षा व ५,००० रू. दंड, न भरल्यास ०४ महिने सश्रम कारावास, ३७६(१)(२)(आय) भादवी व कलम ४ पोस्को अर्तगत १० वर्ष शिक्षा व १०,०००/—रू दंड, न भरल्यास ०६ महिने कारावासाची शिक्षा कु. अन्सारी, जिल्हा सत्र न्यायाधिश क्रं. ०२ चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणात सरकार तर्फे **ॲड. महाजन, सरकारी अभियोक्ता, तर कोर्ट पैरवी म्हणुन नापोका सुखदेव मेश्राम, पोस्टे राजुरा** यांनी काम पाहिले.

———————————————————————————

# स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

## मंदिरातील चोरीसह मोटार सायकल चोरीचे दोन गुन्हे उघड.

दिनांक १४/०५/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पेट्रालिंग दरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे कार्यवाही केली असता आंबेडकर कॉलेज जवळील हनुमान मंदीर येथील चोरी व पोलीस स्टेशन मुल तसेच पोलीस स्टेशन रामनगर येथे नोंद असलेले मोटरसायकल चोरीचे दोन गुन्हे उघड करण्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास यश आले.

स्थानिक गुन्हे शाखेचे सफौ. पंडीत व—हाटे, नापोशी संजय आतकुलवार, अनुप डांगे, गजानन नागरे, जमीर पठाण, मिलींद चव्हाण यांचे पथक दैनंदिन पेट्रोलिंग करीत असताना गोपनिय माहिती मिळाली की, ॲडलॅब टॉकिज परीसर व अष्टभुजा वार्ड परीसर येथे काही व्यक्ती मोटारसायकलसह संशयितरित्या फिरत आहे. या माहिती वरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दोन्ही ठिकाणी सापळे रचुन मिळालेल्या माहितीच्या आधारे विनानंबर प्लेट असलेल्या एकास मोटारसायकल सह ताब्यात घेतले. त्यास कसुन विचार पुस केली असता त्याच्या जवळ असलेली काळया रंगाची बजाज पल्सर २२० हि त्याने त्याचा साथीदार १) धर्मा उर्फ धमेंद्र प्रकाश खोब्रागडे वय २२ वर्ष व २) योगेश उर्फ चिनी विजु सोनी वय १९ वर्ष दोन्ही रा. अष्टभुजा वार्ड यांच्या साहायाने नगर परीषद मुल चे मागिल परीसरातुन रात्रीच्या दरम्यान एका घरासमारून चोरी केल्याचे कबुल केले तसेच सिंधी कॉलनी रामनगर आंबेडकर कॉलेज जवळील हनुमान मंदीराची दान पेटी सुध्दा त्याने त्याचा दुसरा साथिदार क्रिष्णा पडगेलवार वय १५ रा. विठ्ठल मंदीर वार्ड चंद्रपुर याच्या साथिने फोडल्याचे चौकशी दरम्यान समोर आले.

दुस—या कार्यवाहीमध्ये रमाबाईनगर अष्टभुजा वार्ड येथे १) साहिल उर्फ माटया राजु आंबेडकर वय १९ रा. विठ्ठल मंदिर वार्ड व २) अयुब अब्बु शेख वय २९ रा. रमाबाईनगर अष्टभुजा वार्ड यांच्या ताब्यातुन काळया रंगाची हिरो स्प्लेंडर विना नंबरप्लेट मोटर सायकल ताब्यात घेण्यात आली. सदर

मोटरसायकल बाबत विचारपुस केली असता त्यांनी सदर मोटर सायकल ही वरील गुन्हयातिल धर्मा उर्फ धमेंद्र प्रकाश खोब्रागडे याच्या साहयाने रमाबाईनगर येथील एका लग्न कार्यक्रमातुन चोरल्याची कबुली दिली.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपी १) आशिष उर्फ आशा भगवान आलेवार वय १९ वर्ष रा. घुटकाळा वार्ड चंद्रपुर २) धर्मा उर्फ धमेंद्र प्रकाश खोब्रागडे वय २२ वर्ष. ३) योगेश उर्फ चिनी विजु सोनी वय १९ वर्ष दोन्ही रा. अष्टभुजा वार्ड व ४) क्रिष्णा पडगेलवार वय १५ रा. विठ्ठल मंदीर वार्ड चंद्रपुर ५) साहिल उर्फ माटया राजु आंबेडकर वय १९ रा. विठ्ठल मंदिर वार्ड ६) अयुब अब्बु शेख वय २९ रा. रमाबाईनगर अष्टभुजा वार्ड यांना मुद्देमालासह ताब्यात घेतले.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात स्थागुशा प्रभारी पोनि. श्री. ओ.जी. कोकाटे, यांचे नेतृत्वात सफौ. पंडीत व—हाटे, नापोशी संजय आतकुलवार, अनुप डांगे, गजानन नागरे, जमीर पठाण, मिलींद चव्हाण यांनी पार पाडली.

————————————————————————————————————————